# अनुहार

डॉ. सुमति क्षेत्रमाडे

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

A36

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**अनुहार : डॉ. सुमति क्षेत्रमाडे**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ ४७०/-

समस्त वैष्णव जनांना

भावकथेचं हे तुलसीदल,

अर्पण...

## थोडी पार्श्वभूमी

सुमारे २८ वर्षांपूर्वीची गोष्ट. त्यावेळी नोकरीनिमित्त मी गुजरातमध्ये होते. गुजराती भाषा आत्मसात झाली होती. हाती येईल ते गुजराती साहित्य वाचीत होते. त्यामुळे त्या भाषेचा, त्याचप्रमाणे त्या प्रांताचा परकेपणा उरला नव्हता.

एक दिवस माझ्या मैत्रिणीच्या घरी तिच्या बैठकीच्या दालनात झोपाळ्यावर आम्ही दोघी गप्पा मारीत बसलो होतो. बहुतेक गुजराती दिवाणखान्यात शोभेसाठी जी चित्रे वा तसबिरी लावलेल्या असतात, त्यांत श्रीकृष्णाच्या वृंदावन-कुंजवनातल्या रासक्रीडेच्या विविध प्रकारच्या अत्यंत मोहक अशा मोठमोठाल्या रंगीत तसबिरी असतात. आता आधुनिक सजावटीत बराच बदल झाला आहे. पण मी हे २८-३० वर्षांपूर्वीचं सांगते आहे. माझ्या मैत्रिणीच्या दिवाणखान्यात अशा तसबिरी होत्या. त्याशिवाय या तसबिरींमध्ये आणखी एक मोठी तसबीर होती. त्यातली कृष्णमूर्ती गौरवर्णाची, अत्यंत देखणी, कटी पीतांबर, दोन्ही खांद्यांवरून पुढे सोडलेल्या उत्तरीयाचे पदर वाऱ्यावर उडताहेत, गळ्यातली वैजयंती माला हेलकावते आहे, काळेभोर केस मानेवर रुळताहेत, आपले दोन्ही हात उंचावून, काळेभोर विशाल डोळे आकाशाकडे लावून, पावले उंचावून नृत्यवेशात तो उभा आहे- कृष्णाची अशी ही आगळी मूर्ती मी पूर्वी कधीच कुठं पाहिली नव्हती. नजर खिळावी, असं ते अभिनव चित्र आणि तो मनोहारी भावावेश पाहून मी हसून चेष्टेनं म्हटलं,

''काय, गं? हा कृष्ण आकाशात नजर लावून आपली बासरी शोधतोय, की काय? कारण याच्या हातात ती काही दिसत नाही. बहुधा यानेच ती वर चेंडूसारखी उडवली असणार. अन् याच्या मस्तकीचा मोरमुकुटही वाऱ्याने उडून यमुनेत पडलेला दिसतोय. अन् काय, गं? कृष्ण काळा ना? मग हा कृष्ण गोरा कसा? शरदाच्या चांदण्यात न्हाऊन गोरा झाला वाटतं.''

तिने हसून म्हटलं,

''तू म्हणतेस त्या सगळ्या गोष्टी तशा खऱ्याच आहेत. अगं, हा गौरकृष्ण म्हणजे गौरहरी. गौड भक्त याला श्रीकृष्णाचा अवतार मानतात.''

''गौड भक्त? गौड म्हणजे बंगाल-बंगालचा भक्त?''

''हो. बंगालचा हा मोठा संत होऊन गेला. याला गौरांग महाप्रभू अगर श्रीकृष्ण चैतन्य महाप्रभू म्हणतात.''

गौड-बंगाल शब्द कानी पडताच मी ताडकन् उठले.

मी ताडकन् उठले, याचं कारण असं, की मी नुकतीच गुजराती भाषेच्या साहाय्याने बंगाली भाषेचा परिचय करून घेतला होता. गुजरातीत अनुवादित झालेलं शरत्साहित्य वाचून काढलं होतं आणि आता ते मूळ बंगालीतून वाचायला सुरुवात केली होती. त्यामुळे बंगालीविषयी माझ्या मनात आपलेपणा निर्माण झाला होता.

मी तसबिरीजवळ जाऊन गौरांग महाप्रभूंची ती मूर्ती नीट न्याहाळली. मैत्रिणीच्या तोंडून त्यांचं थोडं चरित्र ऐकलं आणि माझं कुतूहल जागृत झालं. चैतन्यचरित्र वाचण्याची इच्छा झाली. तत्पूर्वी मी नुकतंच सौराष्ट्र वैष्णव संत 'नरसी मेहता' यांचं चरित्र वाचलं होतं. आता श्री चैतन्य महाप्रभूंचं चरित्र वाचण्याची इच्छा झाली. माझ्या मैत्रिणीने 'प्रेमावतार चैतन्य देव : लेखक नर्मदाशंकर पंड्या,' हे चरित्र पुस्तक आणून दिलं. मी ते वाचलं. मला ते खूप आवडलं.

चैतन्यचरित्र म्हणजे लोप पावत चाललेल्या भागवत धर्माच्या पुनरुत्थानासाठी, भगवत्भक्तीची विझलेली ज्योत पुन्हा प्रज्वलित करण्यासाठी या महायोग्याने ऐन तारुण्यात संन्यासी बनून आपलं सगळं जीवन कसं व्यतीत केलं, त्याची अत्यंत हृदयंगम कथा आहे.

मध्यंतरी बरीच -चांगली २५ वर्षे लोटली. गुजरातहून परदेशी गेले, तिथून महाराष्ट्रात आले. दरम्यान अनेक वैष्णव-संतांची चरित्रे वाचली. श्रीमद्भागवत तर अधूनमधून नेहमीच वाचते. कारण श्रीमद्भागवत आणि श्रीरामायण हे माझे दोन आवडते ग्रंथ आहेत. हे ग्रंथ नित्य माझ्या नजरेसमोर लागतात.

दोन वर्षांपूर्वी 'विष्णुप्रिया' हे मैथिलीशरण गुप्ता यांचं छोटंसं खंडकाव्य सहज हाती आलं. वाचून काढलं.

'विष्णुप्रिया' ही चैतन्य महाप्रभूंची पत्नी. हे काव्य वाचताच एकाएकी गुजरातमध्ये मैत्रिणीच्या घरी पाहिलेली ती तसबीर माझ्या नजरेसमोर उभी राहिली. ती तसबीर मनात कोरून बसली होती. ती आता स्पष्ट दिसू लागली. वाचलेल्या चैतन्य-चरित्राची स्मृती जागृत झाली. त्यावेळी गौरांग-प्रभूंच्या जीवनचरित्राने मनाचा वेध घेतला होता. आता त्याचबरोबर विष्णुप्रियेनं मनाला ओढ लावली.

खरं तर विष्णुप्रियेचं जीवन म्हणजे महाप्रभूंचंच जीवन. आता विष्णुप्रियेशिवाय मला दुसरं काही सुचेना. मनात जुळत असलेली इथर कथानके बाजूला सारली - नव्हे, आपोआप ती बाजूला सरली. एकच ध्यास 'विष्णुप्रिया'.. विष्णुप्रिया...चैतन्य महाप्रभू... गौरांग महाप्रभू !!

त्यासाठी पूर्वतयारी केली. महाप्रभूंचं जीवन-चरित्र मुळातून वाचणे आवश्यक होते. मला हवं होतं, तसं त्यांचं विस्तृत चरित्र मराठीत उपलब्ध नाही. मग हिंदी, बंगाली मिळाली ती चरित्रे वाचून काढली. पण या कादंबरीसाठी प्रमुख आधार घेतला, तो हिमालय-निवासी श्रीकृष्ण परमभक्त 'प्रभुदत्त ब्रह्मचारी' यांनी पाच खंडांत लिहिलेल्या हिंदी 'श्रीचैतन्य चरितावली' या ग्रंथाचा.

चैतन्य-चरित्रे वाचीत असताना एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात आली, ती म्हणजे गौरांग महाप्रभूंचं जीवनचरित्र म्हणजे साररूप श्रीमद्भागवत आहे.

चैतन्य-चरित्रे वाचताना 'विष्णुप्रिये'वर अधिक लक्ष केंद्रित केलं. कारण कादंबरीचा केंद्रबिंदू तोच आहे. तिची रूपरेषा हलके हलके स्पष्ट होत गेली.

तिच्याबरोबरच पंडित -निमाई-गौरहरि-गौराङ्‌प्रभू-श्रीकृष्ण चैतन्य महाप्रभू यांचीही आकृती क्रमाक्रमाने आपोआपच स्पष्ट होत गेली.

तसं पाहिलं तर विष्णुप्रिया आणि चैतन्य महाप्रभू या दोन भिन्न व्यक्ती, भिन्न आकृत्या नाहीतच. विष्णुप्रिया ही महाप्रभूंची आकृती- त्यांचीच सजीव छाया. ही छाया रेखाटताना मूळ आकृती आपोआपच आकार घेत गेली.

विष्णुप्रिया साकार होत गेली, तोही एक आगळाच अनुभव- वेगळीच अनुभूती. ही कथा लिहीत असता-

उत्तररात्रीच्या शांत, एकांत, शीतल, शुभ वेळी विष्णुप्रियाच आपली जीवनकथा सांगत होती. मी फक्त मोठ्या भक्तिभावाने एकाग्र होऊन ती लिहून घेत होते. ही कथा लिहीत असताना माझी झोप अक्षरश: उडून गेली होती. सबंध दिवस

कामाने थकल्यामुळे शरीराच्या विश्रांतीसाठी रात्री मी बिछान्यावर पडत असे; पण मन..मन भावसमाधीत बुडालेलं असे.

विष्णुप्रिया आपल्या उत्तरजीवनात विशेष गंभीर बनली होती. फार मितभाषी झाली होती. मन अस्वस्थ होऊन जावं, इतका अलिप्तपणा तिच्यात आला होता. तिच्या मनीचे भाव जाणणं दिवसेंदिवस कठीण होऊ लागलं. अशा वेळी उत्तररात्री – कधी कधी तर मध्यरात्रीही बाहेर व्हरांड्यात, चांदण्या-नक्षत्रांनी भरलेल्या आकाशाकडे दूरवर नजर लावून शतपावल्या करीत बराच वेळ तिचं ध्यान केल्याशिवाय, एकाग्रतेनं, अजिजीने तिला आवाहन केल्याशिवाय दुसरा मार्गच नसे. कारण कथा ती सांगत होती ना !

तिची व्यक्तिरेखा आकार घेत असताना तिच्या भोवतालच्या, तिच्या जीवनात आलेल्या (म्हणजे मी आणलेल्या) अनेक व्यक्तिरेखा स्पष्ट होत गेल्या.

विष्णुप्रियेइतकंच शचीमांनी माझं मन व्यापून टाकलं होतं. माझ्या मनीचे सारे आदरभाव त्यांच्या ठिकाणी गोळा झाले आणि त्यांची आकृती त्यांच्या उच्च स्थानाला योग्य अशी बनत गेली.

शुभा, पद्मा आणि कांचनादीदी या तिच्या तीन सख्या. यांपैकी शुभा व पद्मा संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

कांचनादीदी-हिचा महाप्रभू चैतन्य-चरित्रात विष्णुप्रियेच्या अगदी शेवटच्या आयुष्यात तिची सेविका म्हणून एकदाच नाममात्र उल्लेख आलेला आहे. पण मी तिला सुरुवातीपासूनच विष्णुप्रियेची ज्येष्ठ सखी आणि वैष्णवी म्हणून चित्रित केली आहे. क्रमाक्रमाने तिला विष्णुप्रियेची सेविका बनवली आहे आणि विष्णुप्रियेबरोबरच या सखिसेविकेचीही उचित अशी जीवनसमाप्ती केली आहे. त्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

वैष्णवींचा आश्रम, तिथल्या तारिणीमा, शर्वरीदीदी, अन्य वैष्णवी वगैरे सगळं संपूर्ण काल्पनिक आहे.

हो, आणि सलोनी ! श्यामसलोनी ! ही तर अगदीच अकल्पनीय ! काहीही हासभास नसता एका ऐन मध्यरात्री ही अचानक अवतीर्ण झाली. या चित्तमोहिनी,

निरागस, मुग्ध बालिकेला पाहून मी विलक्षण आश्चर्यचकित होऊन गेले, वेडावून गेले. ही बालिका थेट वृंदावन-कुंजवनातून येऊन माझ्यासमोर उभी ठाकली होती. ही कशी, कुठून आली, याचं आजही मला कोडं वाटतं. तिला पाहताच माझं मन अधीर होऊन गेलं होतं, हो, न जाणो ! ही खट्याळ बालिका अचानक, पाहता पाहता पळून गेली, तर पुन्हा हाती नाही लागणार !

तिला शब्दांत पकडून ठेवता ठेवता सकाळ केव्हा झाली, ते कळलंसुद्धा नाही. या लोभस निरागस मुग्धेचं नाव तिनेच माझ्या कानात सांगितलं- 'सलोनी !' श्यामसलोनी ! ही सलोनी म्हणजे श्रीकृष्णाच्या मोरपीस-मुकुटातलं एक छोटंसं, हलतं -थरथरतं मोरपीसच आहे.

हे मोरपीस नजरेसमोर थरथरत असतानाच श्यामचं पात्र हलके हलके दृश्यमान झालं. विष्णुप्रियेच्या या भावाचा चरित्रात नाममात्र उल्लेख अगदी शेवटी आला आहे.

अन्य स्त्रीपात्रे - सीतादेवी, मालतीदेवी, नित्यानंदांच्या दोन पत्नी यांखेरीज सगळी पात्रे कथानकाच्या ओघात आलेली काल्पनिक पात्रे आहेत.

पुरुष पात्रे - चैतन्य महाप्रभूंच्या चरित्रात बहुतेक सगळ्यांचा उल्लेख आहे. काही थोडी पात्रे काल्पनिक आहेत. ज्यांचा चरित्रात उल्लेख आहे, त्यांतल्या सगळ्यांच्या जीवनरेषा कादंबरीला अनुरूप असे कल्पनेचे रंग देऊन मी त्या विस्तृत आणि स्पष्ट केल्या आहेत.

'अनुहार' या नावासंबंधी थोडं सांगावंसं वाटतं. माझं कादंबरी-लेखन चाललंय, हे माहीत असलेल्या एका साहित्यिक मैत्रिणीनं लिहिलं,

'अनुहार' नाव छान, नवीन आहे; पर अर्थ नाही कळला नावाचा.'

काही वाचकांनी पृच्छा केली,

'आपली 'अनुहार' नावाची कादंबरी लवकरच प्रकाशित होत असल्याची जाहिरात वाचली. कादंबरी 'आहार' शास्त्रावर आहे का?'

म्हणून नावासंबंधी थोडा खुलासा करावासा वाटतो. अनुहार (हिंदी) म्हणजे आकृती प्रतिमा. कादंबरीला हे नाव किती अन्वर्थक आहे, ती वाचल्यानंतर सहजी कळावं. भाषासमृद्धीच्या दृष्टीने असे अनेक शब्द आपल्या भाषेत रूढ होणं मला स्वागतार्ह वाटतं.

'अनुहार' ही एक भावकथा आहे. यात कथानकाच्या अनुरोधाने काही उत्कट प्रसंग आलेले आहेत. हे प्रसंग भावनोत्कटतेची जेव्हा परिसीमा होते, त्याच क्षणी ते प्रतीत झालेले आहेत. त्यासंबंधी थोडा खुलासा करणं उचित वाटतं.

हे प्रसंग – उदाहरणार्थ,

संन्यासधर्म स्वीकारल्यानंतर महाप्रभू प्रथमच शांतिपूरला श्रीअद्वैताचार्यांच्या आश्रमात येतात. नवद्वीपी शचीमांना व आपल्या भक्तांना भेटीला येण्यासाठी निरोप पाठवतात. शचीमा तयार होतात. बहूलाही तयार व्हायला सांगतात. त्यावेळी निरोप घेऊन येणारे भक्त जड स्वरात हलकेच म्हणतो,

'बहूला बरोबर आणू नये, अशी प्रभूंची आज्ञा आहे.'

क्रोधायमान झालेल्या शचीमांना विष्णुप्रिया समजावून पाठवते. ती जात नाही, पण प्रभू प्रत्यक्ष घरी येऊन तिला दर्शन देतात.

हा प्रसंग, रथयात्रेचा प्रसंग आणि असेच आणखी काही प्रसंग मी कादंबरीत रेखाटले आहेत.

या प्रसंगांबाबत काही वाचकांची शंका निर्माण होण्याची शक्यता आहे, की,

'असे प्रसंग खरोखरच घडतात का? की हे केवळ कल्पनेचेच खेळ आहेत? फक्त आभास आहेत? की नुसतंच स्वप्नरंजन आहे?'

'नाही. नुसतं स्वप्नरंजन नाही, आभास नाही. असे प्रसंग प्रत्यक्षात घडतात.' असं म्हटलं तर लगेच प्रश्न येईल,

'याला प्रमाण काय? पुरावा काय? पुरावा आहे का दाखवा.'

प्रश्न निरुत्तर करणारा आहे, यात तिळमात्र शंका नाही. शास्त्राला गणिताचं प्रमाण असतं. विज्ञानाला सिद्धांत असतो, पुरावा असतो.

पण भावनेला? भावसमाधीला सिद्धांत नाही, पुरावा नाही, प्रमाण नाही. वात्सल्याचे अश्रू ओघळतात, ते अमोल मोती कुठच्या मापाने मोजायचे? प्रेमाश्रूंची, आनंदाश्रूंची आकडेमोड कुठच्या संख्याशास्त्राने करायची? अनावर दु:खाश्रू तोलायला कुठचा तराजू वापरायचा?

भावनेला – भावसमाधीला प्रमाण, पुरावा एकच – अनुभूती ! आत्मानुभूती!!

ज्याला ही अनुभूती आलेली आहे, त्याला ही गोष्ट केवळ कल्पनारंजन अगर असत्य, अवास्तव वाटणार नाही.